वर्ष-०७ | अंक-४८ | मुंबई, मंगळवार १९ ते २५ ऑक्टोबर २०२१ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती | मराठी साप्ताहिक | मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 नोकरीच्या आमिषाने पुण्यातील तरुणाची फसवणूक, किरण गोसावीच्या महिला सहाय्यकाला अटक

3 → बहिणीच्या मैत्रिणीवर अत्याचार, यवतमाळमध्ये कुख्यात गुंडाची पीडितेला बेदम मारहाण

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक 2 क्षेत्रातील अनधिकृत झोपड्यांवर तोडक कारवाई ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## लाकडी दांडके-लोखंडी रॉड

### *नालासोपाऱ्यात दोन गट भिडले, तुंबळ हाणामारीचा व्हिडीओ व्हायरल*



नालासोपारा : दोन गटांमध्ये लाकडी दांडके, लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्यांनी हाणामारी झाल्याची घटना मुंबईजवळच्या नालासोपारा परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली आहे. या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. नेमकं काय घडलं?

नालासोपारा पूर्व भागातील पांडे नगर, जय अंबे चाळीसमोर दोन गटात तुंबळ हाणामारी झाली आहे. लाकडी दांडे, लोखंडी रॉडसह लाथा बुक्क्याने एकमेकांना मारहाण करण्यात ...पान २ वर...

## प्रत्येक शहरांत वाहनतळ, चेक पोस्ट नजीक ट्रॉमा केअर सेंटर्स उभारण्याचे नियोजन करण्याचे निर्देश




मुंबई - कोविडमुळे आर्थिक संकटात असलेल्या राज्यातील वाहतुकदारांच्या बाबतीत योग्य तो तोडगा लगेच काढला जाईल , वित्त व परिवहन विभाग यांच्या अधिकाऱ्यांना यासंदर्भात निर्देश देण्यात येतील असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले . महाराष्ट्र राज्य ट्रक, टेम्पो, टँकर्स बस वाहतूक महासंघाच्या शिष्टमंडळाने त्यांची सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घेतली व चर्चा केली त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.. यावेळी खासदार , ज्येष्ठ नेते शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री अनिल परब, गृह मंत्री दिलीप वळसे पाटील, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, पोलीस महासंचालक संजय पांडे आदींची उपस्थिती होती.राज्यातील शहरांमध्ये बसेस व ट्रक्स यांच्यासाठी पुरेशा प्रमाणात वाहनतळ असणे गरजेचे आहे त्यादृष्टीने नगरविकास विभागाला सूचना देण्यात येतील व मोकळ्या जागांचे नियोजन करण्यात येईल असेही मुख्यमंत्री म्हणाले. चेक पोस्ट्सच्या ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर उभारण्यासंदर्भात देखील नियोजन करण्यास त्यांनी सांगितले.कोविडमुळे वाहतूकदार आर्थिक संकटात आहेत. त्यामुळे वार्षिक मोटार वाहन करात सूट मिळणे, व्यवसाय करात सूट मिळणे, शाळा व धार्मिक स्थळांच्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा मोटार कर पूर्ण माफ करणे, राज्यभरात वाहने व बसेस थांबण्यासाठी पार्किंग जागा उपलब्ध करणे , कामगार वाहतूक करणाऱ्या वातानुकूलित बसेसची कर कमी करणे, जड व अवजड वाहनांना राज्यातील प्रमुख शहरांत10 ते 16 तास करण्यात आलेली प्रवेश बंदी उठविणे, कालबाह्य प्रलंबित वाहतूक केसेस रद्द कराव्यात, सार्वजनिक सेवा वाहनाच्या तपासणीचे पोलिसांचे अधिकार कमी करणे, अशा मागण्या महासंघाने केल्या. वित्त व परिवहन , पोलीस यांच्यासमवेत त्या मागण्यांसंदर्भात योग्य तो तोडगा काढण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्र्यांनी दिले. या बैठकीस वाहतूक महासंघाचे अध्यक्ष प्रसन्न पटवर्धन, उपाध्यक्ष महेंद्र लूले,, सरचिटणीस दयानंद नाटेकर उपस्थित होते"

## महाराष्ट्र आता पूर्णपणे अनलॉक? मुख्यमंत्री ठाकरेंनी बोलावली महत्त्वाची बैठक



मुंबई, गेल्या दीड ते दोन वर्षांपासून कोरोनामुळे महाराष्ट्राची वाट बिकट झाली होती. आता कोरोनाची लाट ओसरल्यामुळे सर्व बाजारपेठा, शाळा, महाविद्यालय आणि मंदिरं उघडण्यात आली आहे. तसंच ...पान २ वर...

## महाविकासआघाडीतील मंत्र्यांनी नुसतं खुर्च्यांवर बसू नका, तर....: संजय राऊत



शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी विरोधकांच्या टीकेनंतरही प्रत्युत्तर न देणाऱ्या महाविकासआघाडीच्या नेत्यांना चांगलंच सुनावलं आहे. विरोधकांना उत्तर देण्याचं काम केवळ राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे किंवा मीच देणार का? असा सवाल संजय राऊत यांनी केला. तसेच महाविकासआघाडीतील मंत्र्यांनी नुसतं खुर्च्यांवर बसू नये. सत्तेचा उपभोग घेणाऱ्या सर्वांनी विरोधकांना प्रत्युत्तर देणं ही त्यांची जबाबदारी आहे, असंही राऊत यांनी नमूद केलं. ते मुंबईत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांवर बोलत होते. संजय राऊत म्हणाले, "माझं महाविकास आघाडीतील सर्वच मंत्र्यांना आवाहन आहे. नुसते खर्च्यांवर बसू नका. प्रतिहल्ले करा. आघाडीच्या नेत्यांनी फक्त खुर्चीवर न बसता हल्ल्याला प्रतिहल्ला, टोल्याला प्रतिटोला दिला पाहिजे. विरोधकांन...पान २ वर...

## ना डॉक्टर ना कुठली पदवी तरीही शरीरयष्टीसाठी इंजेक्शनचा डोस, पिंपरीत चौघांना अटक



पुणे : मेफेन्टरमाइन सल्फेट या इंजेक्शनची बेकायदा विक्री करणाऱ्या चौघा जणांना पुण्यात अटक करण्यात आली आहे. बिबवेवाडी पोलिसांनी चार जणांना जेरबंद केलं. त्याच्याकडून या इंजेक्शनच्या 211 बाटल्या आणि एक स्विफ्ट कार असा एकूण 2 लाख 6 हजार 548 रुपयांच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला.

काय आहे प्रकरण?

परेश रेणूसे, प्रविणसिंग भाटी, अक्षय वांजले, शौनक संकपाळ अशी अटक करण्यात आलेल्या चौघा आरोपींची नावे आहेत. रेणूसे हा जिम ट्रेनर म्हणून काम करतो. ...पान २ वर...

## वसईत दोन गटात तुंबळ हाणामारी, मध्यरात्री सव्वाबारा वाजता भररस्त्यात ढिशूम-ढिशूम



वसई : वसईत दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. वसई पश्चिम अंबाडी रोडवरील भाजी मार्केटसमोरील मध्यरात्री सव्वाबारा वाजताची ही दृश्यं आहेत. काय आहे प्रकरण? भर रस्त्यावर दोन गटांमध्ये ठोसा-बुक्क्यांनी हाणामारी झाली. मात्र ही मारामारी करणारे कोण आहेत, नेमकी का मारामारी करत आहेत, हे मात्र स्पष्ट झाले नाही. मात्र हाकेच्या अंतरावर माणिकपूर पोलीस ठाणे असतानाही मारामारी करणाऱ्यांची एवढी हिंमत वाढल्याने वसईत कायदा ...पान २ वर...

## न्यूड फोटो व्हायरल करण्याच्या धमकीने 15 वर्षीय मुलीवर बलात्कार, तरुणासह दोघी जणींना अटक



बुलडाणा : 15 वर्षीय मुलीचे न्यूड फोटो काढून ते व्हायरल करण्याच्या धमकीने तिच्यावर वारंवार बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर शहरामध्ये अल्पवयीन मुलीसोबत हा प्रकार घडला. पीडितेच्या तक्रारीनंतर आरोपी नराधम आणि त्याला मदत करणाऱ्या दोन मुलींना पोलिसांनी अटक केली आहे.

काय आहे प्रकरण?

बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर शहरामध्ये राहणाऱ्या एका 15 वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याचा आरोप आहे. तिच्याच परिसरात राहणाऱ्या दोन मुलींमार्फत फसवून तिचे न्यूड फोटो काढण्यात आले. ते फोटो व्हायरल ...पान ४ वर...




*दि.१३.९.२०२१ अष्टमी नवरात्री उत्सवाचे उत्सवाचे औचित्य साधुन *आश्रय सामजिक शैक्षणिक ट्रस्ट या संस्थेच्या वतीने मेकिंग द डिफरन्स चे संस्थापक दीपक विश्वकर्मा यांच्या समाजसेवी संस्था च्या मदतीने रायगढ़ रोहा येथे ३ प्राथमिक आरोग्य केंद्राना ऑक्सिजन मशीन भेट देण्यात आल्या. गेल्या २ वर्षापासून कोरोना सारख्या महाभयंकर आजाराने बरेच जीव गमावले . ते फक्त ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे खास करुन ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र येथे ऑक्सिजनची असलेली कमतरता . ग्रामीण भागातील सर्व सामान्य जनतेला योग्य प्रकारे उपचार व्हावे याकरीता आश्रय सामजिक संस्थेमार्फत हा उपक्रम रोहा येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात राबविण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक श्री. दीपक मोरेश्वर नाईक,संस्थापक उपसचिव गुरुप्रसाद नाईक सहायक कोषाध्यक्ष विनोद मेढे रायगढ़ जिल्हाध्यक्ष प्रमोद सुधाकर पार्टे ,, श्री.रवींद्र तारु तंटामुक्ती अध्यक्ष, रोशन पडवल, व सर्व ग्रामस्थ व प्राथमिक आरोग्य केंद्र येथिल वैद्यकिय अधिकारी तसेच कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आश्रय ट्रस्ट तर्फे ब्लँकेट,बिस्किटे,कपडे,साड्या, महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन चे वाटप करण्यात आले सर्व डॉक्टरांनी मेकिंग द डिफरंस चे संस्थापक दीपक विश्वकर्मा व आश्रय ट्रस्टचे संस्थापक दीपक नाईक यांचे आभार मानले अतिशय गरजेची वस्तू मिळाल्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतील अशी आशा डॉक्टरांनी वेक्त केली ग्रामीण भागात ताबडतोब उपचार होण्यास मदत होईल असे समाधान व्यक्त केले*

# नोकरीच्या आमिषाने पुण्यातील तरुणाची फसवणूक, किरण गोसावीच्या महिला सहाय्यकाला अटक

पुणे : नोकरीच्या आमिषाने फसवणूक केल्याच्या प्रकरणात फरार असलेल्या किरण गोसावीच्या असिस्टंटला पुणे पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. शेरबानो कुरेशी असं महिला सहाय्यकाचे नाव आहे. अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानच्या मुंबई क्रुझ ड्रग्ज प्रकरणात किरण गोसावी हा पंच आहे.

काय आहे प्रकरण?

पुण्यातील चिन्मय देशमुख नावाच्या तरुणाची 2018 मध्ये फसवणूक केल्याचा आरोप आहे. मलेशियात नोकरी लावण्याच्या आमिषाने किरण गोसावी आणि शेरबानो कुराशी यांनी चिन्मयची तीन लाखांना फसवणूक केली होती. त्यानंतर 2018 मध्ये दोघांवर पुण्यातील फरासखाना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. याच गुन्ह्यात पुणे पोलिसांनी शेरबानो कुरेशीला मुंबईतून अटक केली. तिला आज कोर्टात हजर केले जाणार आहे.

दुसरीकडे, किरण गोसावीचा शोध घेण्यासाठी पुणे पोलिसांची दोन पथकं कार्यरत झाली आहेत. महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यांमध्ये किरण गोसावीचा शोध घेतला जात आहे.

पालघरमधील दोन तरुणांचीही फसवणूक

पालघर जिल्ह्यातील एडवण येथील दोन तरुणांची फसवणूक केल्याप्रकरणी किरण गोसावी यांच्यावर अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केळवे सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दोन तरुणांना परदेशात नोकरीनिमित्त पाठवण्यासाठी दीड लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे. उत्कर्ष तरे आणि आदर्श तरे या दोन तरुणांची गोसावींनी फसवणूक केल्याचा दावा केला जात आहे. आर्यन खान प्रकरणात NCB ने ज्याला पंच केलाय, तोच फसवणुकीचं रॅकेट चालवत असल्याचा धक्कादायक आरोप झाल्याने खळबळ उडाली आहे.

मलेशियात नोकरीचं आमिष

आर्यन खान ड्रग्ज प्रकरणामध्ये एनसीबीने किरण गोसावी याला साक्षीदार बनवलेलं आहे. याच किरण गोसावीने अनेक तरुणांची फसवणूक करून त्यांना परदेशात नोकरी देण्याच्या आमिषाने लाखो रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार उघड झाला आहे. पालघर तालुक्यातील एडवण या गावातील दोन तरुणांचीही त्याने दोन वर्षांपूर्वी फसवणूक केल्याचा आरोप झाला आहे. उत्कर्ष तरे आणि आदर्श तरे या दोन तरुणांना मलेशिया येथे कामाला लावतो असे सांगून त्यांच्याकडून दीड लाखाची मागणी गोसावी याने केली होती.

फेसबुकवरुन ओळख

नवी मुंबई येथील कार्यालयातून किरण गोसावी हे फसवणुकीची रॅकेट चालवत होता. फेसबुकवरून मैत्री झाल्यानंतर उत्कर्ष आणि आदर्श यांना गोसावीने मलेशियाला कामाला लावण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर दोघांनीही गोसावीला बँक खात्यात पैसे पाठवले. त्यानंतर त्याने दोघांनाही विमानाचे तिकीट आणि व्हिसा दिला. कोचीन विमानतळावर पोहोचल्यानंतर विमानाचे तिकीट आणि व्हिसा बोगस असल्याचे त्यांना समजले. ते पालघरला परत आले आणि आपली फसवणूक झाल्या प्रकरणी केळवा पोलिसात तक्रार दाखल करण्यासाठी गेले होते.

आम्हाला न्याय द्या


केळवा पोलिसांनी त्यांची तक्रार घेतली नाही म्हणून दोघांनीही तक्रार अर्ज दाखल केला. त्यानंतर दोन वर्षे उलटूनही पोलिसांनी कारवाई केली नसल्याचे उत्कर्ष तरे याने सांगितले होते. माझ्यासारख्या अनेक तरुणांची फसवणूक झाल्याची दाट शक्यता असल्याचे उत्कर्ष याने सांगितले. आमच्या फसवणूक प्रकरणामध्ये किरण गोसावी याला पोलिसांनी पकडून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी. आम्हाला न्याय मिळवून द्यावा असे उतकर्ष तरे आणि आदर्श तरे यांनी टीव्ही 9 मराठीशी बोलताना उत्कर्ष तरे यांनी सांगितले होते.

आर्यन खान प्रकारणामधील पंच किरण गोसावी विरोधात फसवणूक केल्याची तक्रार केळवा पोलीस ठाण्यात दोन वर्षापूर्वी देण्यात आली होती. किरण गोसावी यानं फसवणूक केल्याचा आरोप उत्कर्ष तरे आणि आदर्श तरे या दोन तरुणांनी केला आहे.

के. पी. गोसावी नेमका कोण?

व्हायरल झालेले कथित एनसीबी अधिकारी किरण गोसावी हे देशभरात, परदेशात नोकरी मिळवून देणाऱ्या के. पी. जी. ड्रीम्ज रिक्रूटमेंट कंपनीचे मालक असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे के. पी. जी. ड्रीम्ज कंपनीचं मुंबई आणि नवी मुंबईत कार्यालय आहे. बड्या पोलीस अधिकाऱ्यांच्या संपर्कात, खासगी गुप्तहेर अशीही के. पी. गोसावी यांची ओळख आहे. गोसावी स्वत:च्या वाहनावर पोलिसांची पाटी लावून फिरताना कॅमेऱ्यात कैद असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. याशिवाय नवाब मलिक यांनीही तसा दावा केला आहे. के. पी. गोसावी यांच्याविरोधात 2018 मध्ये पुण्यातील तरुणाकडून गुन्हा दाखल करण्यात आला होता. मलेशियात नोकरीचं आमिष दाखवून 3 लाख उकळल्याचा आरोप संबंधित तरुणाने केला होता, अशीही माहिती आता समोर येताना दिसत आहे.

# अतिवृष्टीमुळे सारं पीक वाहून गेलं, डोक्यावर कर्जाचा डोंगर, भरलेला संसार अर्ध्यावर सोडून बीडमध्ये शेतकऱ्याची आत्महत्या



परळी (बीड) : अतिवृष्टीमुळे शेतीचं प्रचंड नुकसान झालं. त्यामुळे बँकेचे कर्ज, लोकांची देणी आणि कुटुंब कसं चालवावं? या आर्थिक विवंचनेतून एका शेतकऱ्याने स्वत:च्या शेतात दोरीने झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. संबंधित घटना ही परळी तालुक्यातील तडोळी येथे घडली. आत्महत्या करणाऱ्या 40 वर्षीय शेतकऱ्याचं नागनाथ श्रीरंग सातभाई असं नाव आहे. या आत्महत्येने पुन्हा एकदा आर्थिक विवंचनेतून शेतकरी टोकाचे पाऊल उचलत असल्याचं समोर आलं आहे. नागनाथ यांच्या नातेवाईकांचा अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप सरकारची मदतीची घोषणा झाली. मात्र अद्याप रुपयाही मदत मिळाली नाही म्हणून तात्काळ मदत देणे गरजेचे आहे. अन्यथा आत्महत्येचे सत्र सुरुच राहणार आहे. विशेष म्हणजे या आत्महत्या पाठीमागे पोखरा या कृषी विभागाच्या योजनेमधील अधिकाऱ्यांची अनास्था देखील जबाबदार आहे. पेरु लागवडीचे अनुदान वेळेवर दिले नाही. त्यातच आस्मानी संकट यातून ही आत्महत्या झाली असल्याचं नातेवाईकांचा आरोप आहे. तीन वर्षांपासून अनुदान मिळाले नाही तडोळी येथील नागनाथ यांनी गेल्या तीन वर्षांपासून पेरुच्या झाडांची लागवड केली होती. तीन वर्षांपासून कृषी कार्यालयाकडून आजतागायत अनुदान त्यांना भेटले नाही. त्यातच आता अतिवृष्टीने हाता-तोंडाशी आलेली पिके वाया गेली. जमिनीही वाहून गेल्या. नागनाथ यांचे यात मोठे नुकसान झाले होते. तसेच आगोदरच डोक्यावर एवढे कर्ज असल्याने फेडायचे कसे? असा प्रश्न त्यांच्यासमोर होता. याच चिंतेतून नागनाथ श्रीरंग सातभाई यांनी शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. आई, पत्नी, मुलगा, मुलगी असा भरलेला संसार अर्ध्यावर सोडून त्यांनी आपली जीवनयात्रा संपवली.

नागनाथ यांच्यावर भारतीय स्टेट बँकेचे एक लाखापेक्षा जास्त कर्ज आहे. तसेच कृषी विभागाच्या पोखरा योजनेअंतर्गत पेरु या फळबागाची लागवड त्यांनी केली. पण दोन वर्षांपासून सरकारी कार्यालयाचे खेटे मारुनही त्यांना अनुदान मिळत नव्हतं. त्यात अतिवृष्टीने सोयाबीन पीक गेलं म्हणून ते निराशेच्या गर्तेत सापडले होते, असं कुटुंबीयांनी सांगितलं.

आर्थिक विवंचनेतून शेतकऱ्यांचं टोकाचं पाऊल

शेतकरी सततच्या आस्मानी संकटाने हतबल झाला आहे. सणासुदीचे दिवस असल्याने कुटुंबाच्या काही गरजा आहेत. पण अतिवृष्टीमुळे हातचे पीक निघून गेलंय. त्याममुळे निर्माण झालेल्या आर्थिक विवंचनेने अनेक शेतकरी हताश झाले आहेत. राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी दहा हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले. मात्र ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 2022 चे वर्ष उजळावे लागणार की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यातच सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या अनास्था यामुळे शेतकरी टोकाचं पाऊल उचलत आहेत. बीड जिल्हा कृषी विभागातील पोखरा योजनेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र अद्याप त्यांचे संपर्क होऊ शकला नाही. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जेऊरकर यांना संपर्क केला. मात्र त्यांचा फोन नॉटरिचेबल आहे.

## वसईत दोन गटात तुंबळ हाणामारी, पृष्ठ १ वरुन

सुव्यस्था आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलीस आयुक्तालय स्थापन, मात्र गस्तीवर पोलीस नाही वाढत्या लोकसंख्येनुसार गुन्हेगारी रोखण्यासाठी मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय स्थापन होऊन सव्वा वर्ष उलटले आहे. तरीही एकही पोलीस कर्मचारी रात्रीचा गस्तीवर नाही. त्यामुळेच वसई विरारची सुरक्षा सध्या रामभरोसेच चालू आहे की काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. अंबरनाथमध्ये भररस्त्यात मद्यधुंद तरुणीचा धिंगाणा दुसरीकडे, एका मद्यधुंद तरुणीने भररस्त्यात धिंगाणा घातल्याचा प्रकार अंबरनाथमध्ये घडला आहे. या प्रकाराचा व्हिडीओ सुद्धा व्हायरल झाला आहे. तरुणीने रस्त्यावरून जाणाऱ्या काही जणांना शिवीगाळ केली. अखेर तासाभराच्या तमाशानंतर ही तरुणी तिच्या मित्रासोबत निघून गेली. नेमकं काय घडलं? अंबरनाथ पूर्व भागातील गोविंद पूल ते लोकनगरी या दरम्यान झालेल्या नवीन रस्त्यावर हा प्रकार घडला. एक तरुण आपल्या परिवारासह या रस्त्यावरून कारने जात होता. यावेळी अचानक एक तरुणी गाडीसमोर आली आणि गाडीवर हात आपटत शिवीगाळ करू लागली. त्यामुळे या तरुणाने तिला समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र तरुणी पूर्णपणे नशेत होती. रस्त्यावरून जाणाऱ्यांना शिवीगाळ

यानंतर या तरुणीने रस्त्यावरून जाणाऱ्या आणखी काही जणांना शिवीगाळ केली. अखेर तासाभराच्या तमाशानंतर ही तरुणी तिच्या मित्रासोबत निघून गेली. मात्र हा संपूर्ण धिंगाणा मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे. हा प्रकार तासभर सुरु असतानाही पोलीस मात्र तरुणी निघून गेल्यानंतर घटनास्थळी दाखल झाले आणि रिकाम्या हाती परतले.

## न्यूड फोटो व्हायरल करण्याच्या पृष्ठ १ वरुन

करुन तुझ्या आई – बाबांना दाखवेन, अशी धमकी देत तिच्यावर वारंवार बलात्कार करण्यात आला. एवढंच नव्हे तर त्या मुलीला वाटेल तिथे बोलावून तिच्यावर बलात्कार करण्यात आला. त्रास असह्य झाल्यामुळे पीडित मुलीने तक्रार दिल्यावर आरोपी नराधम आणि त्याला सहकार्य करणाऱ्या दोन मुलींना पोलिसांनी अटक केली.पीडितेची घरी तक्रार बुलडाणा जिल्ह्याच्या मलकापूर शहरातील असलेला आरोपी 30 वर्षीय भूषण गजानन बोरसे या नराधमाच्या धमक्यांना बळी पडून वेगवेगळया ठिकाणी वेळोवेळी 15 वर्षीय अल्पवयीन पीडित मुलीच्या अब्रूचे लचके तोडण्याचे कृत्य या नराधमाने केले. वेळोवळी होत असलेल्या अत्याचाराला कंटाळून पीडितेने सर्व हकीकत आपल्या घरी सांगितली. पीडितेच्या आई-वडिलांनी पोलीस स्टेशन गाठले. त्यानंतर पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्यावर कलम 376(2) (N), 354 आ (i), 506, 34 आयपीसी सहकलम 4 बा.लै.अ.सं. अधिनियम 2012 नुसार गुन्हा नोंदवला. कोल्हापुरात पोलिसाकडून बलात्कार दुसरीकडे, कोल्हापुरात एक अत्यंत घृणास्पद घटना घडली आहे. येथे नागरीकांची सुरक्षा करणाऱ्या पोलिसाकडूनच एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातल्या पन्हाळा तालुक्यातील ही संतापजनक घटना घडली आहे. राजेंद्र गणपती पाटील असं अत्याचार करणाऱ्या पोलिसाचं नाव आहे. राजेंद्र पाटील हा पन्हाळा तालुक्यातील करंजफेन गावचा आहे. संबंधित पोलीस हा मुंबई पोलीस दलात कार्यरत असल्याची प्राथमिक माहिती आहे. अल्पवयीन मुलगी गरोदर राहिल्यानंतर ही घटना उघडकीस आली.

# राज कुंद्राच नाही तर शिल्पा शेट्टीवरही लावले गंभीर आरोप, शर्लिन चोप्राने दाखल केला FIR!



मुंबई : बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्रा हे गेल्या अनेक दिवसांपासून हेडलाईन्सचा एक भाग बनले आहेत.

अश्लील चित्रपट बनवल्याप्रकरणी राज कुंद्राला अटक करण्यात आली आहे. तो सध्या जामिनावर तुरुंगाबाहेर आहे. राज कुंद्राची अटक आणि जामिनानंतर आता शर्लिन चोप्रा हिने त्याच्यावर पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहेत. आता तिने अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्या विरोधात एफआयआर दाखल केला आहे. शर्लिनने राज आणि शिल्पावर फसवणूक आणि मानसिक छळ केल्याचा आरोप केला आहे. शर्लिन चोप्राला राज कुंद्रा प्रकरणादरम्यान अनेक आरोपांना सामोरे जावे लागले होते. तिलाही चौकशीसाठी बोलावले गेले होते. ज्याबद्दल तिने सोशल मीडियावर सांगितले आहे. राज आणि शिल्पाविरोधात दाखल केली तक्रार शर्लिन चोप्रा हिने 14 ऑक्टोबर रोजी राज आणि शिल्पाविरोधात एफआयआर दाखल केला होता.

तिने याबाबत मीडियाशी संवाद साधला आहे.

ती म्हणाले की, मी राज कुंद्राविरोधात लैंगिक छळ, फसवणूक आणि धमकी दिल्याबद्दल तक्रार दाखल केली आहे.

## पृष्ठ १ वरुन

### महाराष्ट्र आता पूर्णपणे

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची शक्यताही मावळली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी उद्या महत्त्वाची बैठक बोलावली असून महत्त्वाची घोषणा करण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी उद्या सोमवारी दुपारी 3 वाजता राज्यातील कोविड टास्क फोर्सशी महत्वाची चर्चा करणार आहेत. अहमदनगर आणि इतर काही जिल्ह्यांमध्ये कोविड 19 संसर्गाचे रुग्णं संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे नगरमध्ये लॉकडाऊन लावण्यात आला आहे. पण त्याचा परीणाम तिसऱ्या लाटेत होऊ नये तसंच इतर सुरक्षित जिल्ह्यातील अर्थव्यवस्था पुन्हा पुर्ववत करण्यासाठी सुरक्षित उपाययोजना करून सुरू असलेले निर्बंध उठवण्यासंदर्भात महत्वाची चर्चा होण्याची शक्यता व्यक्तं केली जात आहे. राज्य पुन्हा एकदा अनलॉक करून अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी राज्य सरकार सुरक्षित उपाययोजनांचा आढावा घेऊन निर्णय जाहीर करणार असल्याची माहितीही देण्यात आली आहे. दिवाळीनंतर 2 डोसची अट शिथिल करणार दरम्यान, दसरा झाला आणि आता दिवाळीसारखा मोठा सण तोंडावर आहे. यादरम्यान मोठ्या प्रमाणावर लोक गर्दी करतात, मंदिर उघडलेली आहेत अनेक कार्यक्रमांना परवानगी दिलेली आहे आणि चित्रपटगृहे देखील उघडणार यासर्व पार्श्वभूमीवर कोरोना संख्या कशी वाढते याचा अभ्यास करून कोविड निर्बंधांतून सूट देण्याबाबत मुख्यमंत्री स्तरावर निर्णय होऊ शकतो, असं संकेत राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिले होते. तसंच, लशीचे दोन डोसमधील अंतर अधिक असल्याने नागरिकांची गैरसोय होत असून दिवाळीनंतर कोरोना केसेस कमी राहिल्या तर कोरोना लशीचा एक डोस घेतलेल्या व्यक्तीला टास्कफोर्सच्या सल्ल्यानुसार, उघडलेल्या सर्व क्षेत्रातील उपक्रमामध्ये सहभागी होता येईल, असं वक्तव्यही राजेश टोपे यांनी केलं होतं. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे उद्या काय घोषणा करता हे पाहण्याचं ठरणार आहे.

### लाकडी दांडके-लोखंडी रॉड

आली. या मारहाणीत एका पोलिसाचाही समावेश असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. दोन्ही गटातील 7 जणांना अटक पूर्ववैमनस्यातून ही हाणामारी झाल्याचा दावा केला जात आहे. याबाबत परस्परविरोधी तक्रारीवरून दोन्ही गटातील व्यक्तींवर तुलिंज पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन्ही गटातील 7 जणांना अटक करण्यात आली आहे. या हाणामारीत 4 ते 5 जण किरकोळ जखमीही झाले आहेत. पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दाखल घेऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी घटनास्थळावर पोलीस बंदोबस्तही ठेवला आहे.

वसईत दोन गटात तुंबळ हाणामारी

दुसरीकडे, वसईत दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. वसई पश्चिम अंबाडी रोडवरील भाजी मार्केटसमोरील मध्यरात्री सव्वाबारा वाजताची ही दृश्यं आहेत.

भर रस्त्यावर दोन गटांमध्ये ठोसा-बुक्क्यांनी हाणामारी झाली. मात्र ही मारामारी करणारे कोण आहेत, नेमकी का मारामारी करत आहेत, हे मात्र स्पष्ट झाले नाही. मात्र हाकेच्या अंतरावर माणिकपूर पोलीस ठाणे असतानाही मारामारी करणाऱ्यांची एवढी हिंमत वाढल्याने वसईत कायदा सुव्यस्था आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**पोलीस आयुक्तालय स्थापन, मात्र गस्तीवर पोलीस नाही**

वाढत्या लोकसंख्येनुसार गुन्हेगारी रोखण्यासाठी मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय स्थापन होऊन सव्वा वर्ष उलटले आहे. तरीही एकही पोलीस कर्मचारी रात्रीचा गस्तीवर नाही. त्यामुळेच वसई विरारची सुरक्षा सध्या रामभरोसेच चालू आहे की काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### ना डॉक्टर ना कुठली पदवी तरीही

मेफेन्टरमाइन सल्फेट हे इंजेक्शन हृद्यदाब वाढवण्यासाठी केला जातो. एमडी आणि एमबीबीएस पदवी असलेल्या डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय या इंजेक्शनची विक्री करता येत नाही. असं असतानाही हे चौघे जण जिममध्ये येणाऱ्या तरुणांना शरीरयष्टी वाढवण्यासाठी या इंजेक्शनची बेकायदा विक्री करत होते. नागपुरात रेमडेसिव्हीरचा इंजेक्शनचा काळाबाजार दुसरीकडे, रेमडेसिव्हीरचा इंजेक्शनचा काळाबाजार करणाऱ्या दोघा जणांना नागपूर जिल्हा सत्र न्यायालयाने पाच वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. शुभम अर्जुनवार, ज्योती उर्फ जिया उत्तमसिंग अजित असे शिक्षा झालेल्या आरोपींची नावं आहेत. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत काळाबाजार करताना दोघांना अटक करण्यात आली होती. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत त्यांनी रेमडेसिव्हीर इंजेक्शनचे ब्लॅकमार्केट केल्याचा आरोप झाला होता. हा प्रकार 18 एप्रिल 2012 रोजी सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास वाथोडा परिसरात घडला होता. 25 हजार रुपयांमध्ये रेमडेसिव्हीर इंजेक्शन विकत असताना त्यांच्याकडून 5 इंजेक्शन जप्त करण्यात आली होती. आजपर्यंत रेमडेसिव्हीर काळाबाजार प्रकरणात ही तिसरी केस असून चार आरोपींना कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. नागपुरात वॉर्डबॉयला 3 वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा याआधी, नागपुरातील वॉर्डबॉयला 3 वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. एप्रिल 2021 मध्ये कोरोनाग्रस्त रुग्णाचे रेमडेसिव्हीर इंजेक्शन चोरून विकल्याचा आरोप त्याच्यावर झाला होता. महेंद्र रतनलाल रंगारी असे 28 वर्षीय वॉर्डबॉयचे नाव आहे. तो नागपूरच्या रंगारी चौकातील एका कोव्हिड सेंटरमध्ये कामाला होता. महेंद्र रेमडेसीव्हीर इंजेक्शनचा काळाबाजार करत होता. 17 एप्रिल 2021 रोजी हुडकेश्वर पोलिसांनी महेंद्रवर गुन्हा नोंदवला होता. उच्च न्यायालयाने या प्रकरणाला गांभीर्याने घेऊन फास्ट ट्रॅक कोर्टात प्रकरण चालवण्याचे आदेश दिले होते. याचा तपास तीन महिन्यांत पूर्ण होऊन निकाल लागला. या प्रकरणी मुख्य न्यायदंडाधिकारी एस. बी. पवार यांच्या समक्ष सुनावणी झाली होती.

### महाविकासआघाडीतील मंत्र्यांनी नुसतं

ा शरद पवार, सुप्रिया सुळे, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे किंवा फक्त मीच उत्तर देणार का? तुम्ही काय करताय? जे जे खुर्चीवर बसलेत, सत्तेचा उपभोग घेत आहेत त्या सर्वांची ही जबाबदारी आहे. या सर्वांना बोलावं लागेल. सरकारची प्रतिमा जपण्यासाठी सर्वांना समोर येऊन बोलावं लागेल. हे ८ दिवसात पळून जातील." "मोदी पाकिस्तानात जाऊन केक कापतात, मिठ्या मारतात, आता काश्मीरवर बोला" "आम्ही सातत्याने सांगतोय पाकिस्तानसोबत कोणतेही संबंध ठेऊ नका. राजकीय, आर्थिक, व्यापारी किंवा सांस्कृतिक कोणतेही संबध ठेऊ नका हीच आमची कायम भूमिका राहिलीय. मोदी तिकडं जाऊन केक कापतात, मिठ्या मारतात. तसं आम्ही करत नाही. काश्मीर प्रश्नाची जबाबदारी विरोधी पक्षावर का टाकता? तुम्ही सांगा काय करणार आहात ते. दुबईत क्रिकेट खेळताय का खेळत नाही ते सोडा, जम्मू काश्मीरवर बोला. तिथं काय करणार आहात ते बोला," असं मत संजय राऊत यांनी व्यक्त केलं. "ईडी, सीबीआय, एनसीबीला जम्मू काश्मीरमध्ये पाठवा" संजय राऊत म्हणाले, "ईडी, सीबीआय, एनसीबीला जम्मू काश्मीरमध्ये पाठवा. ते फार पावरफूल लोकं आहेत. अतिरेकी पळून जातील. तुम्ही इथं आमच्यावर ईडी, आयटी, एनसीबीच्या माध्यमातून आमच्यावर हल्ले करत आहात. तुम्ही या तिन्ही चारही संस्था बदनाम केल्यात. राजकीय वापराच्या ठपक्यामुळे या संस्था बदनाम झाल्यात. याना सगळ्यांना काश्मीरमध्ये पाठवा. किरीट सोमय्यांना काश्मीरमध्ये पाठवा. दहशतवाद्यांचे कागदपत्रं आम्ही सोमय्यांना देऊ. जम्मू, काश्मीर, अनंतनाग, बारामुल्ला असं फिरत बसतील." "चंद्रकांत पाटलांनी काश्मीरला जाऊन अतिरेक्यांना दम द्यावा, आम्हाला शहाणपणा शिकवू नये" शरद पवार यांच्याविषयी चंद्रकांत पाटील यांनी ज्या एकेरी शब्दात उल्लेख केला. कुठं शरद पवार, कुठं तुम्ही, कुठं हिमालय, कुठं टेकडी, टेकाड, टेंगुळ. त्यांना हे शोभतं का? त्यांनी काश्मीरला जाऊन अतिरेक्यांविषयी बोलावं. त्यांना दम द्या, आम्हाला शहाणपणा शिकवू नका," असंही राऊत यांनी नमूद केलं.

संपादकीय...



## पालकांच्या मनातला भीतीचा अडथळा कसा ओलांडणार?

कोव्हॅक्सिन लसी लहान मुलांना देण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. देशातील एकूण लोकसंख्येपैकी ३५.३ % हिस्सा हा ०- १४ व ४१ % ० ते १८ वयोगटाचा असल्याने कोरोना महामारीचे नियोजन हे लहान मुलांच्या लसीकरणाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. म्हणून लहान मुलांसाठी लसीला परवानगी मिळणे महत्त्वाचे आहे; पण परवानगी मिळणे व देशातील प्रत्येक मुलापर्यंत लस पोहोचणे यातील अंतर मोठे आहे.लहान मुलांसाठी लसीकरण मोहीम राबविताना सगळ्यात मोठे आव्हान असणार आहे – पालकांच्या मनातील भीती दूर करणे. मोठ्या व्यक्तींसाठी लसीकरण मोहीम सुरू होऊन १० महिने उलटून गेले; पण अजून मोठ्यांमध्ये भीती व गैरसमजांमुळे लस न घेतलेल्यांची संख्या बरीच आहे. लसीची परिणामकारकता व सुरक्षितता सिद्ध होऊनही अजून लसीच्या भीतीचे पूर्ण उच्चाटन झालेले नाही. म्हणून बालरोगतज्ज्ञ, शाळा, शिक्षक व राजकीय, सामाजिक नेत्यांना



प्रत्येक पालकाला आपल्या पाल्याला लस देण्यासाठी प्रेरित करणारी वेगळी सामाजिक मोहीम राबवावी लागणार आहे. सिरोव्हेंप्रमाणे देशातील ५० ते ६० % लहान मुलांना हा संसर्ग होऊन गेला आहे. मग कोरोना संसर्ग होऊन गेला असताना लस कशासाठी, असा प्रश्न पालक विचारत आहेत. संसर्ग होऊन गेला असला तरी कोरोना हा कांजण्याच्या आजाराप्रमाणे आयुष्यभर कायमची प्रतिकारशक्ती बहाल करीत नाही. तसेच नव्या व्हेरियंटस्ने परत संसर्ग होऊ शकतो. कोरोनाच्या नैसर्गिक संसर्गापेक्षा लस शाश्वत व दीर्घकालीन प्रतिकारशक्ती देते.५० ते ६० % मुलांना कोरोना होऊन गेला असे म्हटले तरी ही ५० % मुले कोण हे शोधण्यासाठी प्रत्येकाची रक्त तपासणी करणे जिकिरीचे आहे. लहान मुलांमध्ये कोरोना सौम्य स्वरूपाचा असतो व मृत्युदर अत्यंत कमी आहे; पण तो अगदी शून्य नाही हे लक्षात घेता लहान मुलांना लस आवश्यक आहेच. बालमृत्यूची अनेक कारणे आ वासून उभी असताना त्यात कोरोनाच्या कारणाची भर परवडणारी नाही. लहान मुलांमध्ये कोरोनाचा आजार गंभीर नसला तरी एमआयएससी ही संसर्ग संपल्यावर चार आठवड्यांनी काही मुलांमध्ये होणारी गुंतागुंत जीवघेणी ठरत आहे व याचे उपचारही महागडे आहेत. हे टाळण्यासाठी लसीकरण हाच उपाय आहे. सौम्य आजार असला तरी लहान मुले घरातील इतर मोठ्या व्यक्तींना व त्यातच आजी-आजोबांसाठी संसर्गाचा महत्त्वाचा स्रोत आहे. दुसऱ्या लाटेनंतर मुलांचा घराबाहेर वावर वाढला आहे व लक्षणविरहित मुले सुपर स्प्रेडर ठरत आहेत. हे लसीकरण करण्याचे एक मोठे कारण आहे.'लसीकृत/लसवंत मुले म्हणजे सुरक्षित घर' अशी नवी घोषणा आता लहान मुलांच्या कोरोना लसीकरणाबाबतीत शासनाने द्यावी. पहिल्या टप्प्यात हृदयाचे आजार, किडनीचे आजार, कॅन्सर, थॅलेसिमियासारखे रक्ताचे आजार, मतिमंद व मानसिकदृष्ट्या विकलांग व दिव्यांग मुलांना प्राधान्य देऊन लसीकरण सुरू करावे. यानंतर गरोदर मातांच्या मुलांना व तिसऱ्या टप्प्यात सर्व मुलांना अशा प्रकारे लसीकरण मोहीम पूर्ण करता येईल. वयोगटाच्या बाबतीत आधी १० ते १८ व त्यानंतर २ ते १० वर्षे असे प्राधान्यक्रम ठरविता येतील. २ ते ७ वर्षे वयोगटाला लस देणे हे बालरोगतज्ज्ञांचे विशेष कौशल्य आहे. या वयोगटासाठी देशभरातील बालरोगतज्ज्ञांची मदत घेत झपाट्याने लसीकरण होऊ शकते. कारण इतर लसीकरणासाठी रोज अनेक बालके बालरोगतज्ज्ञांकडे येतात. त्यावेळी आधी कोरोनाची लस व त्यानंतर इतर लसी अशी विनंती बालरोगतज्ज्ञ पालकांना करू शकतात. लहान मुलांच्या बाबतीत मात्र लसीची किंमत कमी करून जास्तीत जास्त खाजगी बालरोगतज्ज्ञांना या मोहिमेत सामावून घेतल्यास लहान मुलांच्या लसीकरणाचे प्रमाण वाढेल. त्यासाठी सध्या खाजगी रुग्णालयाला लसीकरणाची परवानगी व लस साठा मिळविण्याची किचकट प्रक्रिया सोपी करावी लागेल. जोपर्यंत प्रत्येक जण सुरक्षित नाही तोपर्यंत कोणीही सुरक्षित नाही या तत्त्वाला अनुसरून हर्ड इम्युनिटी मिळविण्यासाठी लहान मुलांचा लसीकरण कार्यक्रम तातडीने राबवावा लागेल.

# हे सीमोल्लंघन हवे!

अलीकडे नेमेचि येणाऱ्या पावसाळ्यापेक्षा त्याआधी आणि नंतर येणारे संकट हे अधिक नियमित झाले आहे. पाऊस अपेक्षेप्रमाणे येत नाही. सुरुवातीला पडलाच तर नंतर ओढ देतो. म्हणजे पेरण्या वाया. मग त्याची मदत द्या. ती देऊन उसंत मिळेल तर तेही नाही. नंतर मग अतिवृष्टी. आधी पेरण्या कमी पावसामुळे वाया. नंतर अतिपावसाने वाया. म्हणजे मग पुन्हा आणेवारी करणे आलेच. त्यात दिरंगाईचा आरोप, केंद्राकडून मदतीची प्रतीक्षा, केंद्रास मग महाराष्ट्रापेक्षा गुजरातचा अधिक पुळका येणार, त्या राज्यासाठी मग तिजोरी सैल होणार आणि महाराष्ट्रासाठी देऊ की नको अशी अवस्था, आम्ही किती दिलदार होतो अशी विरोधकांच्या टीका वगैरे सर्व काही आता नित्यनेमाचे झाले आहे. अशा वेळी मग अर्थसंकल्प खरवडून सरकारकडून काहीबाही मदत जाहीर करणे आलेच. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने पूर, अतिवृष्टीबाधितांना नव्याने १० हजार कोटी रुपयांची मदत जाहीर केली. ही अशी मदत द्यावी लागण्याचे हे सलग तिसरे वर्ष. एकेकाळी जी बाब अपवादात्मक परिस्थिती म्हणून विचारात घ्यावी लागत असे ती बाब आता सरसकट नियमित होऊ लागली असून हे 'सृष्टीचे कौतुक' लक्षात घेण्याची गरज आहे.

ताज्या अतिवृष्टीनंतर लगेच मदत दिली जावी अशी मागणी करण्यात येत होती. विशेषत: सध्याचा सणासुदीचा काळ लक्षात घेता शेतकऱ्याहाती लगेच चार पैसे कसे पडतील हे पाहण्याची गरज होती. त्याप्रमाणे उद्धव ठाकरे सरकारने निर्णय घेतला. जुलैअखेर कोकण व पश्चिम महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीनंतर राज्य मंत्रिमंडळाने ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात ११ हजार ५०० कोटींची मदत जाहीर केली होती. नव्याने मदत जाहीर करताना जुलैपासून आतापर्यंत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ही १० हजार कोटींची मदत देण्यात येत असल्याचे सरकारतर्फे स्पष्ट केले गेले. यामुळे नक्की कोणास किती मदत मिळेल असा प्रश्न निर्माण होणे साहजिक. पण त्यास इलाज नाही. मदतीची घोषणा आणि प्रत्यक्ष मदत यात सरकारी हातचलाखी होत नाही, असे म्हणण्याची आपल्याकडे सोय नाही. काही नव्याने जाहीर झालेली, काही जुन्यातली वळवलेली असे प्रकार या मदतीत होतात हे खरेच. पण सरकारी साधनसंपत्तीस असलेल्या मर्यादा लक्षात घेता असे होऊ नये अशी अपेक्षा बाळगणे अगदीच हास्यास्पद आशावाद ठरेल. त्यात ऑगस्ट महिन्यात जाहीर झालेली मदत अद्याप मिळाली नसल्याची ओरड कोल्हापूर, सांगलीत शेतकरी वर्गात आहेच. मागील फडणवीस सरकारनेही सांगली, कोल्हापूर परिसराकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप झाला होता. त्याही वेळी या परिसराने अभूतपूर्व पूरस्थिती अनुभवली. या परिसराच्या तुलनेत निसर्ग आणि तोक्ते चक्रीवादळांचा कोकण किनारपट्टीला लागोपाठ दोन वर्षे फटका बसल्यावर महाविकास आघाडी सरकारने नेहमीच्या निकषांपेक्षा वाढीव मदत जाहीर केली. कोकण हा शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याने ठाकरे सरकारने सहानुभूतीची भूमिका स्वीकारली हे उघडच. पण त्यातून प्रत्येक नैसर्गिक आपत्तीनंतर वाढीव मदत देण्याची मागणी पुढे येऊ लागली. पण अतिरिक्त मदत तरी द्यायची कोठून हा प्रश्न. कारण दुष्काळ वा पूर हे राज्याच्या पाचवीलाच पुजलेले अशी परिस्थिती गेल्या १० वर्षांत बघायला मिळते. प्रत्येक आर्थिक वर्षांत दुष्काळ, अतिवृष्टी वा गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी वर्गासाठी १० ते १२ हजार कोटींची मदत द्यावी लागते. त्यातून सरकारचे सारेच आर्थिक नियोजन बिघडते. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यापासून गेल्या दोन वर्षांत नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्यांसाठी २२ हजार कोटींची मदत जाहीर करण्यात आली. चालू आर्थिक वर्षांच्या अर्थसंकल्पात १० हजार २२६



कोटींची तूट अपेक्षित धरण्यात आली होती. त्यातच १० हजार कोटींची मदत जाहीर केल्याने तूट वाढून त्याचा राज्याच्या तिजोरीला फटका बसणार आहे. नाही म्हणायला पीक विमा योजना असते. त्यासाठी केंद्रातील मोदी सरकार स्वत:ची पाठ थोपटून घेत असले तरी या योजनेतून पैसे हाती येत नाहीत, अशी शेतकऱ्यांचीच तक्रार असते. विम्याचा हप्ता भरूनही नुकसानभरपाईच्या वेळी विमा कंपन्या हात वर करतात, हे राज्यातील शेतकऱ्यांना अनुभवास येते. आणि दुसरे असे की नुकसानभरपाईबाबत केंद्र व राज्याराज्यांमधील निकषात फरक आहेत. यामुळेही असेल पण केंद्र सरकारकडून भरीव मदत मिळत नाही हे सत्य आहेच. गेल्या दोन वर्षांत राज्याने १५ हजार कोटींची मागणी केली असता प्रत्यक्ष हाती २८०० कोटीच मिळाले आहेत. २००५ नंतर राज्यात दुष्काळी वा पूरपरिस्थिती निर्माण होत गेली. शेतकऱ्यांचे नुकसान जास्त होते व त्या प्रमाणात सरकारकडून मिळणारी मदत नुकसानीच्या तुलनेत अल्प असते. कोकणात चक्रीवादळात बागांचे नुकसान झालेल्यांना साफसफाईसाठी सरकारी मदतीपेक्षा जास्त खर्च झाला होता.

अशा परिस्थितीत मदत न देण्याची सोय नाही. राजकीय अपरिहार्यतेमुळेच कोणत्याही पक्षाचे सरकार असो, शेतकऱ्यांना मदतही द्यावीच लागते. अशा मदतीमुळे राज्यांचे वित्तीय नियोजन बिघडते. म्हणूनच अशी मदतींची पॅकेजेस जाहीर करू नका, असा सल्ला नियोजन आयोगाचे माजी उपाध्यक्ष व अर्थतज्ज्ञ डॉ. मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांनी दिला होता.

पण त्याकडे कोण लक्ष देणार? खुद्द काँग्रेसचे सरकार जरी असते तरी त्यांनी अहलुवालिया यांच्याकडे दुर्लक्ष केले असते. निवडून यायचे म्हटले की ही अशी मदत जाहीर करणे आलेच. यामुळे भले राज्याची तिजोरी खंक होत असेल. पण त्यास इलाज नाही. मध्यंतरी शेतकरी मदतीसाठी स्वतंत्र कोष तयार करावा, अशी चर्चा सुरू झाली होती. पण त्यात फार काही पुढे घडले नाही. साहित्य संमेलन आले की संमेलन कोषाची मागणी पुढे येते तसेच हे काही. नुसतीच चर्चा. अर्थात साहित्यिकांच्या वाङ्मयापेक्षा शेतकऱ्यांच्या शेतातील पीक जगणे अधिक महत्त्वाचे हे मान्य. त्यामुळे उलट शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी मदत योजनेचा काही एक विचार आणि कृती व्हायला हवी.

याचे कारण वातावरणातील बदलांमुळे या अशा आपत्ती वरचेवर येणार हे उघड आहे. आधी दुष्काळाचे संकट असायचे, आता गेली तीन वर्षे अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसू लागला आहे. अशा वेळी केवळ सरकारी मदतीतच नव्हे तर शेतकऱ्यांच्या पीकपाण्याच्या पद्धतीतही आमूलाग्र बदल करावा लागणार आहे. कमी काळात तयार होणारी, वातावरणात टोकाच्या बदलांतही टिकून राहणारी आदी वाणे विकसित करावी लागतील आणि त्यांच्या लागवडीसाठी सरकारी पातळीवर उत्तेजन द्यावे लागेल. शेतकरी आपल्या पारंपरिक पद्धतीत सहसा बदल करत नाही. तसा तो करावयाचा असेल तर त्याच्या गळी तो उतरवावा लागेल. याच्या जोडीने पारंपरिक जून ते सप्टेंबर हाच शेतीचा कालावधी धरून चालणार नाही. पाऊसमानात जसा बदल होत आहे तसाच पाऊसकालातही बदल होत आहे. हे सर्व बदल दुर्लक्ष करता येणार नाहीत, इतके ठसठशीतपणे गेली काही वर्षे दिसू लागले आहेत. अशा वेळी त्यांच्याकडे पाठ करून सरकारला चालणार नाही. या बदलांच्या आधारे शेती, बागायतीत काय काय बदल व्हायला हवेत याचा अभ्यास करण्यासाठी सरकारने एखादी तज्ज्ञ समिती नेमावी. तीस कालबद्ध पद्धतीने अहवाल देण्यास सांगावे आणि त्या अहवालावर साधकबाधक चर्चा व्हावी. ही प्रक्रिया अत्यंत वेळकाढू असणार आहे हे लक्षात घेता तीत अधिक वेळ दवडू नये. यंदाच्या विजयादशमीस हे धोरणांचे सीमोल्लंघन सरकारने करावे. नपेक्षा संकटे आणि मदत हे दुष्टचक्र असेच सुरूच राहील.

## कल्याण शीळ रस्त्याच्या अर्धवट कामामुळे कारचा भीषण अपघात, चालक गंभीर जखमी, गाडीचा चुराडा

कल्याण (ठाणे) : कल्याण शीळ रस्त्याचे काम काही ठिकाणी अर्धवट अवस्थेत आहे. रस्त्याच्या अर्धवट कामामुळे आज (16 ऑक्टोबर) एका चारचाकी गाडीला पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला





आहे. गाडी दूरवर फेकली गेली आहे. गाडीचा चालक सुदैवाने बचावला असला तरी गंभीर जखमी झाला आहे. या अपघातात चारचाकी गाडीचा चुराडा झाला आहे. या रस्त्यावर सातत्याने अपघात होत असल्याने नागरिकही हैराण झाले आहेत. या नव्या भीषण अपघाताच्या घटनेमुळे रस्त्याच्या अर्धवट कामाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**नेमकं काय घडलं?**

गाडी चालक आकाश पाटील हा आज पहाटे शीळहून कल्याणच्या दिशेने जात होता. या दरम्यान पांडुरंगवाडी नजीक रस्त्याचे काम अर्धवट आहे. त्याठिकाणी कंत्रटदाराने एक लोखंडी डिव्हायडर पत्रा लावला आहे. हा लोखंडी पत्रा लक्षात न आल्याने पाटील यांची गाडी त्याला जोराने धडकून रस्त्याच्या गटारीत जाऊन उलटी पडली. या रस्त्यालगत असलेले एका दुकानात सूरज भारद्वाज नावाचे रहिवासी झोपले होते. अपघाताचा मोठा आवाज ऐकून त्यांनी रस्त्यावर धाव घेतली. यावेळी आणखी काहीजण आले. घटनास्थळी असलेल्या काहींनी गाडीतून आकाशला बाहेर काढले. त्यानंतर त्याला रुग्णालयात पाठविले. ही घटना पहाटे तीन वाजेच्या सुमारास घडली. या घटनेची नोंद अद्याप पोलीस ठाण्यात करण्यात आलेली नाही.

**राज्य रस्ते विकास महामंडळाचे दुर्लक्ष**

या परिसरातील जागरुक नागरीक संतोष भारद्वार यांनी सांगितले की, या रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून सुरु आहे. अनेक ठिकाणी रस्त्याचे काम अर्धवट आहे. कंत्रटदाराकडून अर्धवट कामाच्या ठिकाणी कोणत्याही सूचना नाही. तसेच रेडीयम पट्टी लावलेली नाही. या ठिकाणी वारंवार अपघात होतात. त्याकडे राज्य रस्ते विकास महामंडळाचे दुर्लक्ष आहे. घटना घडल्यावर त्याठिकाणी कंत्रटदाराने त्याचे कामगार पाठविले. त्यानंतर दिवसभर कामगार अर्धवट कामाच्या ठिकाणी उघड्या असलेल्या लोखंडी गज वाकविण्याचे काम करीत होते. तसेच शेजारी असलेले कल्वर्टचा खड्डा जेसीबीच्या सहाय्याने माती टाकून बुजविला गेला.

**अंबरनाथमध्ये भरधाव बसची दुचाकीस्वाराला धडक**

दरम्यान, अंबरनाथमध्येही दोन दिवसांपूर्वी भीषण अपघाताची घटना समोर आली होती. भरधाव बसने दुचाकीस्वाराला उडवून 10 ते 15 फूट लांब फरफटत नेल्याची घटना अंबरनाथमध्ये घडली आहे. या अपघातात दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी झाला आहे. अंबरनाथ आणि उल्हासनगर दरम्यानच्या रिलायन्स पेट्रोल पंपासमोर बुधवारी रात्री ही घटना घडली. अंबरनाथच्या चिखलोली पाडा परिसरात राहणारे मंगेश पवार हे त्यांची पत्नी धनश्रीसोबत अंबरनाथहून विठ्ठलवाडीच्या दिशेने त्यांच्या दुचाकीवर जात होते. यावेळी मागून आलेल्या बसने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली

**अपघातामुळे तरुणाची प्रकृती गंभीर**

पवार पती-पत्नीची दुचाकी अंबरनाथ आणि उल्हासनगर दरम्यानच्या रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ आली असता रस्त्यावर असलेल्या खड्ड्यामुळे त्यांनी गाडीचा वेग कमी केला. यावेळी मागून आलेल्या भरधाव बसने त्यांना जोरदार धडक दिली. इतकंच नव्हे, तर त्यांना तब्बल 10 ते 15 फूट लांबपर्यंत फरपटत नेले. या अपघातात मंगेश पवार यांच्या डोक्याला, चेहऱ्याला, छातीला दुखापत झाली असून पोटातही अंतर्गत दुखापत झाली आहे.

## बहिणीच्या मैत्रिणीवर अत्याचार, यवतमाळमध्ये कुख्यात गुंडाची पीडितेला बेदम मारहाण



यवतमाळ : कुख्यात गुंडाने बहिणीच्या मैत्रिणीवर अत्याचार करुन पीडितेला मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यवतमाळ शहरातील जामनकर नगर परिसरात उघडकीस आला आहे. आरोपी अक्षय शरद बगमारे उर्फ बागा फरार आहे.

काय आहे प्रकरण?

नवरात्रौत्सवाचा जागर सुरु असतानाच गुंडाने बहिणीच्या मैत्रिणीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अत्याचार केल्यानंतर तो थांबला नाही, तर पीडितेला बेशुद्ध करुन अज्ञात स्थळी नेत बेदम मारहाणही केली. त्यानंतर तिला घरी सोडले. पीडितेचे वडील घरी परतल्यानंतर शुक्रवारी सकाळी हा प्रकार उघडकीस आला.

आरोपी अक्षय बगमारे उर्फ बागा कुख्यात गुंड अक्षय शरद बगमारे उर्फ बागा असे 25 वर्षीय आरोपीचे नाव आहे. बागा हा अक्षय राठोड टोळीचा सदस्य असून त्याच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापैकी काही गुन्हे तो अल्पवयीन असतानाच दाखल झाले होते. आरोपी फरार झाला असून अवधुतवाडी पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. वडिलांना जीवे मारण्याची धमकी पीडित तरुणीच्या आईचे कर्करोगाने निधन झाले आहे. याच धसक्याने तिच्या मोठ्या बहिणीनेही प्राण सोडले. त्यामुळे पीडिता आणि तिचे वडील असे दोघेच घरी राहतात. याच संधीचा फायदा घेत अक्षयने पीडितेला तिच्या वडिलांना जीवे मारण्याची धमकी देत तिच्यावर बळजबरी केली. दारुच्या नशेत अत्याचार गुरुवारी मध्यरात्री दोन वाजता अक्षय पीडितेच्या घरी गेला. त्यावेळी तो दारुच्या नशेत होता. त्याने पुन्हा तिच्यावर अत्याचार करत तिला बेशुद्ध केले. त्यानंतर तिला अज्ञात स्थळी नेत बेदम मारहाणही केली. अखेर तिला रिक्षाने घरी सोडले. पीडितेचे वडील घरी परतल्यानंतर शुक्रवारी सकाळी हा प्रकार उघडकीस आला. पीडित तरुणीच्या शरीरावर मारहाणीचे वळ आहेत. अखेर धीर एकवटून तिने घडला प्रकार वडिलांना सांगितला. त्यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दाखल केली.

## पूर्वीचा 400 चा दंड भरा, पुण्यात चालकाने वाहतूक पोलिसावर गाडी घातली, 800 मीटर फरफटवलं

पुणे : पूर्वीच्या थकित वाहतूक नियमभंगाच्या दंडाची 400 रुपयांची रक्कम भरण्यास सांगितल्याने एका कार चालकाने वाहतूक पोलीस हवालदाराच्या अंगावर गाडी घातली. त्यानंतर त्याला बोनेटवरून 700 ते 800 मीटर अंतरापर्यंत फरफटत नेल्याचा धक्कादायक पुण्यात घडला आहे. या प्रकरणी पुण्यातील मुंढवा पोलिसांनी कार चालकाला बेड्या ठोकल्या आहेत. काय आहे प्रकरण? प्रशांत श्रीधर कांतावर (वय 43 वर्ष, रा. कन्हैया कॉम्प्लेक्स, महंमदवाडी, हडपसर) याला अटक केली आहे. याबाबत पोलीस हवालदार शेषराव जायभाय (वय 43 वर्ष) यांनी मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी प्रशांत कांतावर याच्यावर खूनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना मुंढवा सिग्नल चौकात खराडी बायपास रोड आणि साईनाथ नगर आणि झेन्सॉर कंपनी फाटा खराडी बायपास रोड दरम्यान शुक्रवारी दुपारी सव्वाचार ते साडेचार वाजताच्या सुमारास घडली. नेमकं काय घडलं? याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सहायक पोलीस निरीक्षक राजगुरु यांच्या देखरेखीखाली पोलीस हवालदार शेषराव जायभाय आणि त्यांचे सहकारी वाहनांवरील पूर्वीच्या ऑनलाईन खटल्यांची दंडाची रक्कम कारवाई करत होते.

## ज्याने पाच फ्लॅट ताब्यात घेतले त्याच्यावर गुन्हा दाखल




नागपूर. फ्लॅटचा ताबा मिळाल्याप्रकरणी कोराडी पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारदार सुधीर गुप्ता (56), रामदापेठचा रहिवासी आहे. आरोपी मोहम्मद. सह्या मोहम्मद. इस्माईल हा जाफर नगरचा रहिवासी आहे. नारा मधील आर्य नगरमध्ये असलेल्या जमिनीवर रॉयल फ्लॅट स्कीम तयार आणि विकण्यासाठी दोघांमध्ये करार झाला होता. योजना तयार झाल्यानंतर दोघांमध्ये व्यवहाराबाबत वाद झाला. 21 डिसेंबर 2020 ते 17 ऑक्टोबर 2021 दरम्यान, मोहम्मद. सह्या यांनी स्कीम क्रमांक 101, 102, 108, 203 आणि 409 चा ताबा घेतला आणि सदनिका रिकामी करण्यासाठी सुधीरकडे पैशांची मागणी केली. एवढेच नाही तर त्याने परिसरात बॅनर लावून सुधीरचा अपमान केला. यामुळे हे प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचले. तपासानंतर आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला.

## राज ठाकरेंना वॉचमननं ओळखलं नाही म्हणून मारहाण? काहींना अटक, नेमकं प्रकरण काय?



मुंबई : मनसे प्रमुख राज ठाकरे यांचा फोटो ओळखत नसल्याबद्दल मराठी अभिनेत्रीने वॉचमनला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. मुंबईतील घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. वॉचमनला मारहाण करणारी महिला मनसेची कार्यकर्ता असल्याची माहिती आहे. मुंबईच्या मालवणी पोलिसांनी मराठी चित्रपट दिग्दर्शक, निर्माता आणि त्यांच्या ड्रायव्हरला अटक केली आहे, तर अभिनेत्रीला पोलिसांनी नोटीस दिली आहे. काय आहे प्रकरण? मालवणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अटक करण्यात आलेले आरोपी मुंबईतील मढ परिसरात असलेल्या बंगल्यात जाऊन सुरक्षारक्षकाला मारहाण करून पैशांची मागणी करत होते. एवढंच नाही तर मारहाणीनंतर त्यांनी या घटनेचा व्हिडीओही व्हायरल केला. या घटनेनंतर पीडित वॉचमन दयानंद गोड यांनी मालवणी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी भादंविच्या कलम 452,385,323,504,506,34 अन्वये गुन्हा दाखल करून तिन्ही आरोपींना अटक केली. मनसे विभाग अध्यक्षांचं म्हणणं काय चारकोप विधानसभेचे मनसे विभाग अध्यक्ष दिनेश साळवी यांनी सांगितले की, मराठी दिग्दर्शक, निर्माते आणि एक मराठी अभिनेत्री शूटिंगचे ठिकाण पाहण्यासाठी मढ़ येथील एका बंगल्यात गेले होते, तिथे सुरक्षा रक्षकाने मनसे प्रमुख राज ठाकरे यांचा फोटो पाहून त्यांना ओळखत नसल्याचे सांगितले. त्यानंतर अभिनेत्रीने सुरक्षारक्षकाला थप्पड लगावली, मात्र पोलिसांनी नोंदवलेला गुन्हा चुकीचा असल्याचं साळवींचं म्हणणं आहे.

## खतरनाक... पती मोबाईल देत नाही, पत्नीने विळ्याने पतीचे ओठ कापले



भंडारा : मोबाईलच्या नादात कोण करेल याचा काहीही नेम नाही. अशीच एक धक्कादायक घटना भंडाऱ्यातील मासळ येथे घडली आहे. येथे एका पत्नीने मोबाईलसाठी आपल्या पतीचे विळ्याने ओठ कापले आहेत. याप्रकरणी पत्नीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेमकं काय घडलं? भंडाऱ्यातील मासळ येथे खेमराज बाबुराव मुल (वय – 40) हे राहातात. त्यांचा मोबाईल बिघडला असल्याने त्यांनी त्यांच्या पत्नीचा मोबाईल घेतला. मात्र, दोन दिवस उलटूनही त्यांनी पत्नीला तिचा मोबाईल परत केला नाही . त्यामुळे गुरुवारी (14 ऑक्टोबर) त्यांच्यात मोबाईलसाठी खूप भांडण झालं. हे भांडण इतक्या टोकाला गेलं की पत्नीने रागाच्या भरात येऊन घरातील विळा खेमराज यांना फेकून मारला. हा विळा खेमराज यांच्या तोंडावर बसला आणि त्यात त्यांचे ओठ कापले गेले. यानंतर तशाच जखमी अवस्थेत खेमराज हे लाखांदूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले. त्यानंतर त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यानंतर खेमराज यांच्या जबाबावरुन आणि वैद्यकीय तपासणीनंतर त्यांच्या पत्नीविरोधात लाखांदूर पोलीस ठाण्यात कलम 324 आणि 504 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पतीचे दुसऱ्या महिलेशी प्रेमसंबंध, पत्नीकडून पतीची गोळी झाडून हत्या, मग शरीराचे तुकडे पतीचे दुसऱ्या महिलेशी असलेले प्रेमसंबंध कळल्यावर एका महिलेला तिचा संताप इतका अनावर झाला की तिने तिच्या पतीची हत्या केल्याची धक्कादायक घटना ब्राझिल येथे घडली आहे. महिलेने प्रथम आपल्या पतीला ठार मारले, नंतर त्याच्या शरीराचे लहान लहान तुकडे करुन सुटकेसमध्ये भरले. सुटकेसमध्ये मृतदेहाचे तुकडे घेऊन जाणारी महिला सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली, ज्याच्या आधारे पोलिसांनी तिला अटक केली. सूडाच्या भावनेने बनली खूनी 'डेली स्टार'च्या बातमीनुसार, ब्राझीलमध्ये राहणाऱ्या एलीझ मात्सुनागाला तिचा पती मार्कोस मात्सुनागाचे दुसऱ्या महिलेशी असलेल्या संबंधांबद्दल माहिती मिळाली. तिच्या पतीच्या फसवणुकीमुळे, एलिसाचा संताप अनावर झाला.







विजयादशमी च्या शुभ मुहूर्तावर सोशल राईट्स फाऊंडेशन च्या वतीने कारोना च्या बंद काळात ऑनलाईन कायदेविषयक प्रशिक्षण चे वर्ग घेण्यात आले या प्रशिक्षण वर्गात कोर्स पूर्ण केल्यामुळे त्यांना सोशल लाइट्स फाऊंडेशन चे संस्थापक दीपक मोरेश्वर नाईक तसेच मराठी एकीकरण संघटनेचे कार्याध्यक्ष ऍड प्रमोद सामंत,अध्यक्ष गोवर्धन देशमुख,सचिन घरत, निकेत इंगळे, प्रवीण सुर्वे, व सर्व पदाधिकारी यांच्या समवेत मानवाधिकार मराठी साप्ताहिक संपादक अश्विनी नाईक परब,पोलीस बातमी व्हिडिओ पोर्टल चे सागर परब,आश्रय ट्रस्ट चे विनोद मेढे यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले

## मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक 2 क्षेत्रातील अनधिकृत झोपड्यांवर तोडक कारवाई





मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात येत असून गेल्या काही आठवड्यापासून अशी अनधिकृत बांधकामे जमिनदोस्त केली जात आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका उपायुक्त (अतिक्रमण विभाग) मारुती गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली विविध प्रभागातील अनधिकृत बांधकामांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी झालेल्या बैठकीत उपायुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रभागातील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत होर्डिंग्ज, अनधिकृत झोपड्या यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे प्रभागातील अनधिकृत बांधकामांवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी असणाऱ्या अभियंता व बीट निरीक्षक यांनी दुर्लक्ष केल्यास त्यांना जबाबदार धरुन त्यांच्याविरुद्ध कारवाईचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश प्रभाग अधिकाऱ्यांना देण्यात आले.

दिनांक १४ ऑक्टोबर २०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्रमांक २ कार्यक्षेत्रातील शास्त्रीनगर व नेहरूनगर परिसरातील अनधिकृत झोपड्यांवर महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत तोडक कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई आयुक्त दिलीप ढोले यांच्या आदेशानुसार व उपायुक्त (अतिक्रमण) मारुती गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिक्रमण विभाग प्रमुख नरेंद्र चव्हाण, प्रभाग क्रमांक २ च्या सहाय्यक आयुक्त प्रियंका भोसले, सहाय्यक आयुक्त चंद्रकांत बोरसे, कनिष्ठ अभियंता वैभव कुलथे, सुदर्शन काळे, विकास शेळके, संदीप जटाळकर, फेरीवाला पथक प्रमुख माने,

भैरव नाईक यांच्या उपस्थितीत तसेच अतिक्रमण विभागाचे पोलीस कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बल व कर्मचारी यांच्या सहाय्याने सदर बांधकामावर तोडक कारवाई करण्यात आली आहे.

## सायकल लावण्यावरुन शेजाऱ्यांमध्ये वाद, 35 वर्षीय तरुणाची डोक्यात दगड घालून हत्या




अहमदनगर : दोन शेजाऱ्यांमध्ये किरकोळ कारणावरुन झालेल्या वादात अहमदनगरमध्ये एकाला प्राण गमवावे लागले. सायकल पार्क करण्यावरुन झालेल्या भांडणानंतर 35 वर्षीय तरुणाची डोक्यात दगड घालून हत्या करण्यात आली.

### काय आहे प्रकरण?

अहमदनगरमध्ये वाळकी येथील दोन शेजाऱ्यांमध्ये किरकोळ कारणावरुन झालेल्या वादात एकाचा मृत्यू झाला. जावेद गनीभाई तांबोळी (वय 35 वर्ष) या तरुणाची डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना नगर तालुक्यातील वाळकी येथील स्टेट बँकेसमोर चौकात घडली.

### नेमकं काय घडलं?

वाळकी येथे शेजारी राहणाऱ्या दोन कुटुंबात सायकल लावण्याच्या कारणावरुन वाद झाले. या वादाच्या रागातून वाळकी येथील भांड्याचे व्यापारी गनीभाई तांबोळी यांचा मुलगा जावेदचा डोक्यात दगड घालून खून करण्यात आलाय. या घटनेने वाळकी हादरली असून काही काळ तणाव निर्माण झाला होता.

या घटनेची माहिती मिळताच नगर तालुका पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी अधिक तपास पोलीस करत असून नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पिंपरीत पत्नीची डोक्यात वार करुन हत्या

दुसरीकडे, चारित्र्याच्या संशयातून पत्नीची हत्या करणाऱ्या पतीला पोलिसांनी जेरबंद केलं आहे. पिंपरी चिंचवड शहरातील वाकड पोलिसांनी हत्येचा उलगडा करण्यात यश मिळवलं आहे. थेरगावमध्ये 23 सप्टेंबरला बाळासाहेब जाधव याने पत्नी सुनीता जाधवची डोक्यात वार करुन हत्या केली होती पोलिसांनी अखेर आरोपी बाळासाहेब जाधव याला जेरबंद करत बेड्या ठोकल्या आहेत. विशेष म्हणजे आरोपी यापूर्वी दोन वेळा घर सोडून पळून गेला होता. त्यावेळी आधी सात वर्ष, तर दुसऱ्या वेळी तीन वर्ष त्याचा थांगपत्ता लागला नव्हता. हत्येनंतर मात्र पोलिसांनी त्याला महिन्याभराच्या आत पकडण्यात यश मिळवलं आहे.

## डॉ.राजन शिंदे यांच्या खुनातील शस्त्र अखेर सापडले, डंबेल, चाकू अन् टॉवेल पोलिसांच्या हाती, अल्पवयीन आरोपी ताब्यात

औरंगाबाद: राज्यभरात गाजत असलेल्या डॉ. राजन शिंदे खून प्रकरणाचा तपास अंतिम टप्प्यात आहे. हा खून करण्यासाठी आरोपीने वापरलेली शस्त्रे अखेर पोलिसांच्या हाती लागली आहेत. ही शस्त्रे आरोपीने जवळच्याच विहिरीत टाकल्याचे सांगितले होते. मात्र या विहिरीत मोठ्या प्रमाणावर गाळ, कचरा पाणी असल्याने गेल्या दोन दिवसांपासून ही विहीर उपसण्याचे काम पोलिसांकडून सुरु होते. आता ही शस्त्रे सापडल्यानंतर पोलिसांनी या खून प्रकरणी एका अल्पवयीनाला ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

काय आहे राजन शिंदे हत्या प्रकरण?

सोमवार 11 ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास औरंगाबाद शहरातील मौलाना आझाद महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. राजन शिंदे यांचा राहत्या घरी अत्यंत क्रूरपणे खून झाला होता. हा खून कोणी केला, याचा तपास करण्यासाठी शिंदे यांचे निकटवर्तीय, कुटुंबीय, नातेवाईक, शेजारी, महाविद्यालयातील कर्मचारी अशा सर्वांची चौकशी करण्यात येत होती. एकाने खून केल्याची कबुली दिल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली असून ते दोन दिवस, दोन रात्री अखंड पाण्याचा उपसा

डॉ. शिंदे यांच्या घराजवळील विहिरीतील पाणी उपसा शनिवार 16 ऑक्टोबरला दुपारी 3 वाजल्यापासून सुरु करण्यात आला



शस्त्र घराजवळीलच विहिरीत टाकल्याचे सांगितले होते. ही विहीर अनेक वर्षांपासून पडीक असल्याने त्यात मोठ्या प्रमाणावर कचरा आहे. त्यामुळे त्यात गॅसही असण्याची शक्यता होती. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश आघव, अजबसिंग जारावाल, मुकुंदवाडी पोलिस निरीक्षक ब्रम्हा गिरी घटनास्थळी तळ ठोकून होते. होता. महापालिकेच्या मदतीने पाच एचपीचे दोन आणि दोन एचपीचे दोन अशा चार पंपांद्वारे पाणी उपसण्याचे काम सकाळपर्यंत सुरु होते. यात आणखी एक मोटार वाढवण्यात आली आहे. यासाठी आठ ते दहा कर्मचारी काम करत होते. संपूर्ण पाणी उपसल्याशिवाय शस्त्र सापडणार की नाही याची उत्सुकता सर्वांना लागली होती.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898